संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# महागाईपेक्षा टंचाईची समस्या अधिक त्रासदायक

**दोनच दिवसांपूर्वी** याच स्तंभातून आम्ही 'उन्हाळ्याचा दुहेरी चटका' अशा मथळ्याखाली मजकूर लिहिला होता. वाढणारे तापमान तर दुसरीकडे युद्धाचा होणारा दुष्परिणामही अधोरेखित केला होता. आता गॅसच्या दरामध्ये झालेली वाढ हे त्याचेच निदर्शक ठरते. विशेषतः इराणकडून जवळपास दहा अरब देशांवर क्षेपणास्त्र डागली जात आहेत. या दहाही देशांशी भारताचे आर्थिक आणि व्यापारी संबंध आहेत. विशेषतः तेल व्यापार हा सर्वाधिक प्रमाणात होतो. भारत जरी रशिया, अमेरिका, या देशांकडून तेल घेत असला तरी आपली गरज पूर्ण करण्याकरीता अरब अमिरातसारख्या देशांकडूनही मोठा तेलसाठा घ्यावा लागतो. यातल्या काही देशांकडून नैसर्गिक वायू, स्वयंपाकाला लागणारा गॅस यासारख्या वस्तूंचीदेखील आयात करावी लागते. परंतु आता हे इराण-अमेरिका युद्ध लांबत असल्याने या तेल आयातीवर मोठा परिणाम होत आहे. स्वयंपाकाचा गॅस पुरेशा प्रमाणात उपलब्ध होईल की नाही याबद्दल साशंकता निर्माण झालेली आहे. स्वाभाविकपणे युद्धाची ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन तेलसाठ्याच्या उत्पादनावरही परिणाम झालेला दिसून येतो. भारत हा तेलसाठ्याचा सर्वात मोठा ग्राहक आहे. देशाची मोठी लोकसंख्या आणि तिच्या इंधनाची गरज लक्षात घेऊन हा साठा पुरेसा राहील याचीदेखील काळजी घ्यावी लागते. गेल्या काही दिवसांत तेलसाठ्यावर परिणाम होत असल्याने भारताला आवश्यक असलेला तेलसाठा उपलब्ध होऊ शकलेला नाही. या टंचाईसदृश्य परिस्थितीत इंधनाची गरज भागवण्याकरीता केंद्र सरकार प्रयत्न करते आहे. महिनाभरापूर्वी रशियाकडून खरेदी करायच्या तेलसाठ्यात कपात केली गेली होती. परंतु आता ती पुन्हा वाढवावी लागली आहे. युद्धाची परिस्थिती अशीच कायम राहिली तर पेट्रोल डिझेलसारख्या इंधनपुरवठ्यावरही त्याचा परिणाम होईल. आता प्रामुख्याने घरगुती गॅससाठी लागणाऱ्या सिलिंडर पुरवठ्यावरही बऱ्यापैकी परिणाम झाला. आंतरराष्ट्रीय बाजारात उत्पादनात घट झाल्याने किमतीदेखील कच्च्या तेलाच्या आणि अन्य इंधनाच्याही किमती वाढलेल्या आहेत. या किंमत वाढीचा लागलाच परिणाम भारतावरही झाल्याने आता देशभरात घरगुती गॅसच्या किमतीमध्ये ६५ रुपयांनी तर व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमतीत १६५ रुपयांनी वाढ झालेली आहे.

### जागतिक इंधनदरात वाढ

आंतरराष्ट्रीय बाजारातल्या किंमतवाढीचा हा थेट परिणाम जरी असला तरी युद्धजन्य परिस्थितीत त्याची गंभीरता आणखीनच वाढलेली आहे. युद्ध किती दिवस चालेल याची कोणतीही खात्री नाही. परंतु देशातला इंधनपुरवठा कायम ठेवण्यासाठी सरकारला वेगळे आणि विशेष प्रयत्न करावे लागतील हे स्पष्टपणे दिसून येते. गॅस सिलिंडरच्या किमतीत झालेली वाढ ही आंतरराष्ट्रीय बाजारातल्या किंमतवाढीचा जरी परिणाम असला तरी भविष्यकाळातील मोठ्या टंचाईचा तो इशारा ठरू शकतो. भारताची एलपीजी गॅसची गरज जवळपास साठ ते सत्तर टक्के आखाती देशांवर अवलंबून आहे. सध्याच्या परिस्थितीत पंचवीस ते तीस दिवस पुरेल एवढाच गॅस सिलिंडरचा साठा आहे. प्रामुख्याने कतारमधून भारताला सर्वाधिक पुरवठा होतो. परंतु तिथले तेल उत्पादन थांबल्याने त्याचा मोठा परिणाम झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. विशेषतः इराण परिसरात असलेली होर्मुज खाडीची नाकेबंदी इराणने केलेली आहे. म्हणूनच हा मोठा प्रश्न निर्माण झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. आज देशात जवळपास चाळीस कोटी एलपीजी ग्राहक आहेत. त्यातले साडेदहा कोटी ग्राहक हे पंतप्रधान उज्ज्वला योजनेचे लाभार्थी आहेत. ही सगळी गरज पूर्ण करण्याकरीता भारताला अन्य मार्गाने घरगुती गॅसचा पुरवठा पूर्ववत करावा लागेल. शिवाय भारतातले गॅस सिलिंडरचे उत्पादनही वाढवावे लागेल. अमेरिका-इराणमध्ये युद्ध होईल, अशी शक्यता जरी व्यक्त झाली होती तरी हे युद्ध नेमके केव्हा सुरू होईल याबद्दल सरकारला त्याची फारशी कल्पना आलेली नाही. म्हणजे या युद्धाची सुरुवात होण्यापासून ते या युद्धाच्या परिणामापर्यंत एकूणच जगभरात बरीच अनिश्चितता पाहायला मिळते. आतादेखील युद्ध केव्हा थांबेल याबद्दल मोठीच अनिश्चितता आहे. म्हणूनच भारतालादेखील आपला इंधनसाठा पुरेसा ठेवण्याबाबत निश्चित निर्णय घेता आलेले नाहीत. यातला सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे अमेरिका, इराण हे युद्ध जरी सुरू झाले तरी इतर अरब राष्ट्र ओढले जाईल असे वाटले नव्हते. कारण भारताला या इतर अरब राष्ट्रांकडूनही आपला तेलसाठा कायम ठेवता येईल, अशी खात्री वाटत होती.

### अन्य वस्तूही महागतील

आज परिस्थिती अशी आहे की, अनेक अरब राष्ट्रांशी चांगले संबंध असूनही भारताला आपली गरज भागवता येणे कठीण झाले आहे. या युद्धाचे जे काही परिणाम गृहित धरले जात आहेत त्यामध्ये व्यापक स्तरावर आंतरराष्ट्रीय अस्थिरता हा मुद्दा तर आहेच. परंतु भारतासारख्या देशाला लोकसंख्येचा विचार करता अनेक वस्तूंच्या टंचाईचा सामना करावा लागू शकतो. आज नुसती गॅस सिलिंडरमध्ये झालेली दरवाढ त्याची एक चुणूक आहे. विशेषतः व्यावसायिक गॅस सिलिंडरचे दर १६५ रुपयांनी वाढले याचा अर्थ हॉटेलमधल्या पदार्थांच्या किमतीतही वाढ होऊ शकते. म्हणजेच कोणत्याही इंधनातली दरवाढ ही महागाईला निमंत्रण देणारी आहे. म्हणूनच आम्ही ऐन उन्हाळ्यामध्ये या युद्धाच्या झळा महागाई आणि टंचाईच्या रूपाने सोसाव्या लागू शकतात. अनेक प्रकारच्या इंधनांच्या उत्पादनातली घट ही किंमतवाढ करणारी ठरते. परिस्थितीची आवश्यकता लक्षात घेऊन एकवेळ ही किंमतवाढही सहन करता येईल. परंतु टंचाई निर्माण होणे हे अधिक त्रासदायक ठरू शकते. या समस्येची तीव्रता लक्षात घेऊन सावधानतेच्या काही उपाययोजना गरजेच्या आहेत. म्हणजेच सगळ्या प्रकारच्या इंधनाचा वापर हा समजून उमजून केला गेला पाहिजे. जर पेट्रोल-डिझेलचाही तुटवडा जाणवण्याची शक्यता असेल तर आतापासूनच देशभरातील वाहन वापरावर बंधने आणली गेली पाहिजेत. तरच इंधनसाठी युद्ध परिस्थिती निवळेपर्यंत टिकवून ठेवता येईल.